जनसामान्यांच्या मनातील आरसा

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार
२८.०९.२०२६

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ३५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## सततची नापिकी, कर्जाचा वाढता भार अन त्यात दुष्काळ, राबत्या शेतात जीवन संपवलं

### बळीराजाच्या संयमाचा बांध फुटला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – सततची नापिकी आणि दुष्काळामुळे अमरावती जिल्ह्यात कर्जबाजारी शेतकऱ्याने विष प्राशन करून जीवनयात्रा संपवली आहे.

दोन दिवसांपूर्वी बळीराजाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची माहिती आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर येथील ही घटना असून या घटनेनं सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे. कर्जाच्या ओझ्याला कंटाळून ५२ वर्षीय गजानन अलोने या शेतकऱ्याने शेतातच विष प्राशन करून आत्महत्या केल्याची माहिती आहे. कुटुंबावर विविध बँकांच्या कर्जाचा भर, कर्जाच्या ओझ्याला कंटाळून मृत्यूला कवटाळलं मिळालेल्या






माहितीनुसार, कुटुंबावर विविध बँकांचे कर्ज असल्याची माहिती आहे. बँक ऑफ महाराष्ट्र चिंचोली शाखेचे सुमारे १ लाख ४० हजार रुपये कर्ज, तसेच गृहकर्ज असल्याची माहिती आहे.

कुटुंबाची सामूहिक शेती अवघी दीड एकर असून कर्जाचा बोजा मोठा होता. अशातच नियमित कर्ज फेडत असल्याने कर्जमाफीच्या यादीत नाव नाही म्हणून हतबल झालेल्या शेतकऱ्याने राबत्या शेतातच जीवन यात्रा संपवली आहे. मृत शेतकऱ्याच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, आई-वडील आणि पत्नी असा परिवार आहे.

आम्ही दोघेही नवरा बायको शेतामध्ये गेलो, मात्र त्यानंतर आम्ही दोघेही नवरा बायको शेतामध्ये गेलो त्यावेळी शेतातील पीक व्यवस्थित नव्हतं, आमच्यावर कर्ज सुद्धा आहे, त्यानंतर माझे पती आणि मी घरी आलो. नंतर ते शेतात गेले होते, अशातच त्यांनी शेतात जाऊन विष घेऊन आत्महत्या केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेचा 'शिवसेना मदत कक्ष' सुरु करण्यात आलं आहे.


## सीजेपीच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी नाकारली परवानगी

### अभिजीत दिपकेंकडून २ ऑक्टोबरला 'जेल भरो'ची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर संस्थापक अभिजीत दिपके यांनी २ ऑक्टोबर रोजी मुंबईत 'जेल भरो' आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन सायंकाळी ४ वाजता होणार असल्याचे दिपके यांनी एक्सवरील पोस्टद्वारे स्पष्ट केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह उगझच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

'लोकशाही वाचवा'चा नारा 'मुंबईत जेल भरो आंदोलन, २ ऑक्टोबर, शिवाजी पार्क #लोकशाहीवाचवा' अशी संक्षिप्त पोस्ट दिपके यांनी एक्सवर केली आहे. रविवारी दिलेल्या निवेदनात त्यांनी, आंदोलनाला परवानगी न दिल्यास गांधी जयंतीच्या दिवशी मुंबईत






जेल भरो आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला होता. अभिजीत दिपके यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना उद्देशून आणखी एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी 'Gyanu Must Go!' असे म्हटले आहे. तसेच, २ ऑक्टोबर रोजी होणारे 'जेल भरो' आंदोलन सायंकाळी ४ वाजता सुरू होणार असल्याचेही दीपके यांनी त्या पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे.

पोलिसांनी सांगितले पर्यायी ठिकाण मुंबई पोलिसांनी शिवाजी पार्क येथे आंदोलनाला परवानगी देण्याचे अधिकार आपल्याकडे नसल्याचे स्पष्ट केले आहे. मुंबई पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या २०१३ च्या आदेशानुसार आणि त्यानंतरच्या राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शिवाजी पार्क हे 'सायलन्स झोन'मध्ये येते. त्यामुळे आयोजकांना मुंबईतील अन्य ठिकाणाचा पर्याय शोधण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पर्यायी ठिकाणासाठी अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार केला जाईल, असे पोलिसांनी सांगितले आहे

निवडणूक आयोगाविरोधात सीजेपीची मोहीम २ ऑक्टोबरचे आंदोलन हे ज्ञानेश कुमार आणि भारतीय निवडणूक आयोगाविरोधात सीजेपीने सुरू केलेल्या मोहिमेचा भाग आहे. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास मुंबईपासून देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा सीजेपीने यापूर्वी केली होती.

सीजेपीच्या तीन प्रमुख मागण्या ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेऊन त्यांच्याविरोधात फौजदारी कारवाई सुरू करावी, अशी सीजेपीची पहिली मागणी आहे. तसेच मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला स्थगिती देऊन जानेवारी २०२५ मधील मतदार यादी पूर्ववत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### जळगावात पुलावरून खाली पडून ज्योतिषाचा मृत्यू, मुलगी थोडक्यात बचावली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***जळगाव*** – जळगावच्या अमळनेर शहरातील प्रताप महाविद्यालयाजवळील रेल्वे उड्डाणपुलावर दुचाकीचा अपघात होऊन एका ज्योतिषाचा मृत्यू झाला. पुलाच्या कठड्याला दुचाकी धडकल्यानंतर चालक पुलावरून खाली पडला. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला आणि पोटाला गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या अपघातात त्यांची मुलगी किरकोळ जखमी झाली. मुलीसोबत दुचाकीवरून जात असताना अपघात मृत व्यक्तीची ओळख विजय घनश्याम भार्गव ऊर्फ विजू महाराज (वय ४५, रा.केशव नगर, अमळनेर) अशी झाली आहे.

## नाशिक जिल्ह्यात वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये ११ जणांचा बळी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***लासलगाव*** – नाशिक शहरासह जिल्ह्यात तीन अपघातात सात, पाण्यात बुडून तीन आणि सर्पदंशाने एक आदी वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये बाप लेकासह एका दांपत्याचा आणि परराज्यातील तिघांचा समावेश आहे.

नाशिकमधील संजय सोनवणे वाडीवऱ्हे परिसरातील डोहात पोहत होते. वडिलांना पोहताना पाहून त्यांचा मुलगा श्रीलाही पाण्यात उतरण्याचा मोह आवरला नाही. तो पाण्यात बुडू लागला. मदतीसाठी ओरडणाऱ्या पोटच्या गोळ्याला पाहून संजय सोनवणे यांच्या



काळजाचा ठोका चुकला. त्यात संजय सोनवणे यांचा मृत्यू झाला तर मुलगा श्री पाण्याच्या वेगात वाहून गेला. दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह पाण्यात आढळला.

**खदाणीमधील पाण्यात युवक बुडाला–** सिडको परिसरातील खाणीत गणपती विसर्जनासाठी गेलेले रिक्षाचालक संदीप खनपटे(२३) याचा पाण्यात बुडून दुर्दैव मृत्यू झाला. खदानीच्या तळाशी मोठ्या प्रमाणात गाळ असल्यामुळे तो पाण्याबाहेर येऊ शकला नाही

**दाम्पत्याचा अपघात–** नाशिक शहरातील भिसे मळा परिसरातील हरिशंकर जाधव आणि संध्या जाधव हे दांपत्य वाहनातून प्रवास करत होते. उमराळे गावाजवळ त्यांच्या वाहनाला धडक बसून अपघात झाला. या दुर्घटनेत दोघांच्याही डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला.

**दुचाकी अपघातात दोघांचा मृत्यू–** सिन्नर तालुक्यातील नांदूर शिंगोटे निमोण मार्गावरील पेट्रोल पंपाजवळ दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात योगेश सोपान ठाकरे (२७) आणि रामदास रावसाहेब माळी (३२) यांचा मृत्यू झाला.

**सर्पदंश मृत्यू–** नाशिक तालुक्यातील सिद्धपिंपरी येथील शेतकरी विजय ढिकले हे आपल्या शेतात मध्यरात्री पाणी भरत असताना त्यांना विषारी सापाने दंश केला. त्यांचा मृत्यू झाला.

## देशभरात ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात काँग्रेसचा एलार

### नागपुरात निवडणूक आयुक्ताचा पुतळा जाळला | तर आंदोलनामागे शहरी नक्षलवाद्यांचे डोके, परिणय फुकेंचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नागपूर*** – काँग्रेसच्या वतीने संपूर्ण देशात आणि राज्यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. अशातच नागपूरच्या संविधानिक चौकात केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेस आंदोलन करत आहे. काँग्रेस शहर अध्यक्ष प्रफुल गुडधे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन केले जात आहे. मात्र यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या मोर्च्याला पोलिसांनी




अडवलं आहे. परिणामी नागपूर काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले आहे.

दरम्यान पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याचा मागणीला घेऊन काँग्रेस आक्रमक झाली असून आज मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहे. तर हा संविधानावर हल्ला आहे. मोदी-शाह आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आम्ही अधिक आक्रमक पवित्रा घेत लढा तीव्र करू, अशी प्रतिक्रीय काँग्रेस शहर अध्यक्ष प्रफुल गुडधे यांनी दिली आहे. तर परिणय फुकेंनी खुल्या चर्चेला समोर यावं असे आव्हान देखील त्यांनी केलं आहे. काँग्रेसच्या देशव्यापी आंदोलनाच्या मागे शहरी नक्षलवाद्यांचे डोके, भाजप आमदार परिणय फुके यांचा दावा राहुल गांधी यांना चीनची सुपारी घेऊन देशात अराजकता पसरवण्याचे काम करत आहे.

## 'बिग बॉस' फेम दिव्या शिंदेचा पुण्यात राडा! ५ लाखांची मागणी, डॉक्टरांच्या घरात घुसून मारहाण : अखेर अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पुणे*** – 'बिग बॉस मराठी ६'मधून चर्चेत आलेली सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर दिव्या शिंदे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. यावेळी एका निवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्याच्या घरात घुसून मारहाण केल्याचा आणि ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप तिच्यावर आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर रविवार (दि.२७) दिव्याला अटक



करण्यात आली. मात्र, दिव्या चर्चेत येण्याची ही पहिलीच वेळ नाही. सिंहगड लॉ कॉलेजमधील आंदोलनापासून ते 'बिग बॉस'च्या घरातील वादग्रस्त वक्तव्यांपर्यंत तिचं नाव याआधीही अनेकदा चर्चेत आलं आहे. निवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्याला मारहाण; पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे कटक मंडळातील निवृत्त मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्याधर गायकवाड यांच्या तक्रारीवरून दिव्या शिंदेला अटक करण्यात आली आहे.




# आजचा विकास उद्याचा धोका ठरू नये!

## ‘बांबू अर्थव्यवस्था व शाश्वतता परिषदे’त राज्यपालांचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** - आजचा विकास उद्याचा धोका ठरू नये, अशा विकासाचा मार्ग स्वीकारण्याची गरज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी रविवारी व्यक्त केली.

प्लास्टिक आणि लाकडाला शाश्वत पर्याय म्हणून त्यांनी बांबूचा पुरस्कार केला. ग्रामीण उपजीविका, रोजगार आणि हवामान कृतीला बांबूमुळे चालना मिळू शकते. हवामान बदलाशी लढण्याची ताकद असलेली बांबू ही निसर्गाची देणगी आहे, असे राज्यपाल म्हणाले.

पवई लेक परिसरातील द वेस्टिन येथे ’बांबू अर्थव्यवस्था व शाश्वतता परिषद-२०२६’ आयोजित करण्यात आली होती. परिषदेच्या उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले, ’आजचा विकास उद्याचा धोका ठरता कामा नये.’ ही परिषद जागतिक बांबू दिनाच्या निमित्ताने घेण्यात आली. द फिनिक्स फाऊंडेशन, टेफ्लाज आणि मित्रा यांनी संयुक्तपणे तिचे आयोजन केले होते. बांबू मूल्य साखळीतील प्रत्येक घटक या निमित्ताने एका छताखाली आला.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरयाणा, उत्तराखंड, दिल्ली आणि आसामसह एकूण १३ राज्यांतून शेतकरी व शेतकरी नेते आले होते.

कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे माणुस घडविणारी पाठशाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन व नियमित कार्यक्रम उदघाटन सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.जी.आर.तडस, प्रमुख मार्गदर्शक डॉ.विनायक भटकर, प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.विष्णु पडवाल तर उदघाटक म्हणुन डॉ.रविकांत महिंदकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्तविकातून रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शशिकांत काळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापनेचा संपुर्ण इतिहास समजावुन सांगितला.

याप्रसंगी डॉ.विनायक भटकर, डॉ.विष्णु पडवाल, डॉ.विकांत महिंदकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.श्रीकांत काळे, महिला रासेयो कार्यक्रमाधिकारी अर्चना राऊत, प्रा.दीप आवारे, प्रा.लिलाधर चौधरी, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, संतोष चव्हाण, निलेश बंदे, दुर्गा हरले, अनिल हरले तसेच रासेयो स्वयंसेवक ईश्वरी बहुरूपी, भुमिका ढोकणे, ऋतुजा ढोकणे, तेजश्री कळस्कर, अंकिता नागदेवते, कृणाल चव्हाण, अजय ढोमणे, आदित्य उमेकर, यशवंत कुसराम, पवन धुर्वे, किरण खंते, अभिषेक धुर्वे, निरज वानखडे, प्रज्वल बोळाखे, पियुष बडोदेकर, वैष्णव नरसिंगकर, लुंबिनी ढोले, तनुजा पोकळे, देवश्री शेंडे, कृतिका चरपे, सारिका मरस्कोल्हे इत्यादी स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ऋतुजा ढोकणे हिने तर ईश्वरी बोहरूपी हिने आभार मानले.

# महानुभाव पंथातील चौथे ईश्वरी अवतार श्री गोविंद प्रभू यांचा जन्मोत्सव वरुडात भक्तिभावाने संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – महानुभाव पंथातील चौथे ईश्वरी अवतार श्री गोविंद प्रभू (राऊळमाय) यांचा जन्मोत्सव श्री चिंतेश्वर दत्त मंदिर येथे २४ व २५ सप्टेंबर रोजी अत्यंत भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

दोन दिवस विविध धार्मिक विधी, चरित्र वाचन, गीता पारायण, महाआरती, प्रमाणपत्र वितरण आणि महाप्रसादाच्या कार्यक्रमांमुळे मंदिर परिसर भक्तिरसाने भारावून गेला. २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आरती नंतर प.पू.चंदा आई दर्यापूरकर यांनी श्री गोविंद प्रभू यांच्या चरित्रातील जन्म अध्यायाचे वाचन करुन उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. त्यानंतर रात्री ९.३० वाजता विशेष मंगल स्नान, पूजा आणि अवसर आरती पार पडली. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीसह श्री गोविंद प्रभू यांचा जन्मोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला.

२५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता गीता पारायण, उटी आणि पूजाविधी पार पडले. त्यानंतर महाआरतीने वातावरण भक्तिमय झाले. दुपारी १२.३० वाजता ९ ऑगस्ट रोजी पंचकृष्ण प्रबोधन परिषद, बुलढाणा यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय भगवद्गीता परीक्षेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी कारंजेकर व बिडकर पिढीच्या वतीने प्रसाद वंदनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी घेतला. तसेच परमसेवक अशोक भेले यांच्या वतीने आयोजित महाप्रसादाचा लाभ शेकडो भक्तांनी घेतला.

संपूर्ण जन्मोत्सवाचे नियोजन आणि यशस्वी आयोजन श्री चक्रधर मंडळाचे अध्यक्ष उज्वल डहाके, सचिव विनय चौधरी तसेच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले. दोन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे मंदिर परिसरात श्रद्धा,भक्ती आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडले.

स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू विद्यालय येथे

# द्वितीय पालक-शिक्षक सभा उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** - मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन यांच्या वतीने संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू स्कूल व एच.के.एम.उर्दू हायस्कूल वरुड येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील द्वितीय पालक-शिक्षक सभेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील समन्वय अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी अब्दुल शकील होते तर वसीमभाई, अशपाकभाई आणि शेख अमरभाई यांचा जागरुक व आदर्श पालक म्हणून शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात नईम शेख जरुडकर यांनी विद्यार्थ्यांचे खानपान, मानसिक आरोग्य, क्रीडा आणि स्पर्धा परीक्षा या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सय्यद सादिक यांनी आंतरशालेय औषधी वनस्पती प्रदर्शनी तसेच पालक-शिक्षक-विद्यार्थी यांची जबाबदारी आणि परस्पर प्रतिसाद याविषयी माहिती दिली. शेख मुनज्जिम आणि मोहम्मद निसार यांनी संगणक शिक्षण व परिवहन व्यवस्थेवर मार्गदर्शन केले. तर मौलाना वजाहत अली आणि मौलाना मूर्तजा यांनी पालक समुपदेशन तसेच अरबी विषयाच्या महत्त्वाविषयी विचार मांडले.

कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे व्यवस्थापकीय संचालक एहराज फैसल यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन नईम अहमद यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

**वरुड** : सहकारमहर्षी व माजी आमदार, लोकनेते नरेशचंद्र ठाकरे उपाख्य बाबासाहेब यांचा वाढदिवस नुकताच विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.



पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देतांना कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रमोद उर्फ बाळु पाटील, माजी संचालक सुभाष शेळके, रामचंद्र राऊत व इतर.



पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देतांना कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक व भाजप नेते अमित कुबडे, संचालिका तथा माजी जि.प.सभापती अर्चना मुरुमकर, निळकंठ मुरुमकर, इंद्रभुषण सोंडे, रुपाली सोंडे.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना माजी जि.प.सदस्य गोपाल मालपे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष बाबाराव बहुरुपी



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना युनियन बँक ऑफ इंडिया शाखा वरुडचे व्यवस्थापक नरेश सहारे व न.प.माजी उपाध्यक्ष किशोर भगत.



पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देतांना कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, सचिव नंदकिशोर बोडखे, संचालक प्रविण मानकर, उमेश ठाकरे व इतर.



वाढदिवस प्रसंगी उपस्थित तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती अध्यक्ष तुषार निकम, माजी नगरसेवक धनंजय बोकडे, गणेशराव खरडे, विकास पांडे.



डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखडे, निळकंठ उर्फ बाळु मुरुमकर, बाबाराव काळे व इतर.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना बेलोरा येथील सर्वेश ताथोडे पाटील.



लक्ष्मणरावदादा देशमुख बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव जी.टी.तायवाडे, डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, राईबाई डोमाजी सोनारे विद्यालय वघाळचे मुख्याध्यापक अजय बरडे.

# सोन्या-चांदीच्या बाजारात अस्थिरता राहण्याची शक्यता



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – सुट्टीमुळे कमी दिवसांच्या या आठवड्यात अमेरिकेतील आर्थिक आकडेवारी, पश्चिम आशियातील तणाव आणि त्याचा कच्च्या तेलाच्या किमतींवर होणारा परिणाम यांमुळे सोने आणि चांदीच्या बाजारात पुन्हा एकदा अस्थिरता पाहायला मिळू शकते, असे विश्लेषकांनी सांगितले. बाझारातील घटकांचे लक्ष आता अमेरिकेच्या आर्थिक कॅलेंडरकडे वळेल; ज्यामध्ये ग्राहक आत्मविश्वास, जीडीपी आणि पीसीई महागाईची आकडेवारी तसेच युरोझोनमधील महागाईच्या आकड्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, फेडरल रिझर्व्हच्या अधिकाऱ्यांची भाषणे आणि अमेरिकेतील रोजगाराची आकडेवारी यांमुळे सोन्या-चांदीच्या बाजाराला पुढील दिशा मिळेल, विशेषतः अमेरिका आणि इराणमधील वाद, महत्त्वाची भूमिका बजावत राहील.

# संपादकीय

**आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.**

## वैयक्तिक कर्तृत्वापेक्षा राष्ट्रहिताचा ध्यास: अशोक सिंघल यांचे समर्पित व्यक्तिमत्त्व

काही व्यक्ती आपल्या वैयक्तिक यशामुळे इतिहासात नोंदल्या जातात, तर काही जण स्वतःचे संपूर्ण आयुष्य एखाद्या विचारासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या ध्येयासाठी अर्पण करतात. अशोक सिंघल हे दुसऱ्या प्रकारातील व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी व्यक्तिगत प्रतिष्ठा, पद किंवा सत्तेचा मोह न ठेवता आपले आयुष्य हिंदू समाजाच्या संघटनासाठी आणि राम जन्मभूमी आंदोलनासाठी समर्पित केले. त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने ते केवळ विश्व हिंदू परिषदेचे नेते नव्हते, तर राष्ट्रनिर्माणाच्या एका व्यापक संकल्पनेचे वाहक होते. त्याच वेळी त्यांच्या सार्वजनिक भूमिकांबाबत समाजात आणि राजकारणात वेगवेगळे दृष्टिकोनही मांडले गेले. अशोक सिंघल यांचा जन्म २७ सप्टेंबर १९२६ रोजी आग्रा येथे झाला. त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले; मात्र करिअरच्या पारंपरिक वाटेऐवजी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचारक म्हणून पूर्णवेळ कार्य स्वीकारले. संघाच्या कार्यपद्धतीने त्यांच्यात संघटनकौशल्य, शिस्त आणि दीर्घकालीन ध्येयासाठी सातत्याने काम करण्याची वृत्ती विकसित केली. पुढे विश्व हिंदू परिषदेत त्यांनी नेतृत्वाची भूमिका स्वीकारली आणि हिंदू समाजाच्या विविध धार्मिक परंपरांना एका मंचावर आणण्याचा प्रयत्न केला. राम जन्मभूमी आंदोलन हे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात महत्त्वाचे पर्व ठरले. अयोध्येतील राम मंदिराच्या प्रश्नाला त्यांनी केवळ धार्मिक विषय म्हणून न पाहता सांस्कृतिक अस्मिता आणि ऐतिहासिक न्यायाचा मुद्दा म्हणून मांडले. देशभरात धर्मसभा, यात्रांचे आयोजन, संत-महंतांचे समन्वय आणि जनजागरणाच्या माध्यमातून त्यांनी या आंदोलनाला व्यापक स्वरूप दिले. त्यांच्या समर्थकांच्या मते या आंदोलनाने कोट्यवधी लोकांना सांस्कृतिक ओळखीच्या एका समान धाग्यात बांधले. तथापि, राम जन्मभूमी आंदोलनाचा इतिहास हा केवळ एका बाजूने पाहण्याचा विषय नाही. या आंदोलनाच्या काळात देशात मोठे सामाजिक आणि राजकीय तणाव निर्माण झाले. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडल्यानंतर देशभरात दंगली उसळल्या आणि या घटनेवर विविध चौकशा, न्यायालयीन प्रक्रिया आणि राजकीय वादविवाद झाले. अशोक सिंघल यांच्या भूमिकेबाबत समर्थकांनी त्यांना सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व करणारे मानले, तर टीकाकारांनी त्यांच्या आंदोलनाच्या परिणामांबद्दल प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे त्यांच्या वारशाचा विचार करताना या दोन्ही बाजूंचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो. विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून त्यांनी केवळ राम मंदिरापुरतेच कार्य मर्यादित ठेवले नाही. गोरक्षण, मंदिरांचे संरक्षण, वनवासी भागातील सामाजिक उपक्रम, धार्मिक शिक्षण आणि सांस्कृतिक जनजागरण अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी संस्थात्मक काम उभारण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वात विविध धर्माचार्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न झाले, ज्यामुळे संघटनात्मक पातळीवर विश्व हिंदू परिषदेचा विस्तार झाला.

# पांढऱ्या शुभ्र कागदावरची स्वप्नं: रेखाकला परीक्षेची एक साधी, सुंदर सफर!

महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या शासकीय रेखाकला परीक्षा म्हणजेच एलिमेंट्री आणि इंटरमीडिएट या दोन्ही परीक्षांमध्ये उत्तम गुण मिळवण्यासाठी प्रत्येक विषयाचा सराव कसा करावा, याचे सविस्तर मार्गदर्शन खालीलप्रमाणे आहे.

या परीक्षांमध्ये मुख्यत्वे वस्तुचित्र, संकल्पचित्र, आणि भूमिती व अक्षरलेखन हे विषय असतात. वस्तूचित्र / स्थिरचित्र या पेपरमध्ये तुमच्यासमोर काही वस्तु (उदा. हंडा, बादली, डबा, विट, फळे, पुस्तक) ठेवल्या जातात, त्या जशा दिसतात तशा हुबेहूब कागदावर रेखाटायच्या असतात.

**सराव कसा करावा?**

दररोज घरातील वस्तूंचे रेखाटन: घरात असणाऱ्या साध्या वस्तु (चहाचा कप, पाण्याची बाटली, भांडी, पुस्तकांचा संच) समोर ठेवुन त्या वेगवेगळ्या कोनातून कागदावर रेखाटण्याचा सराव करा.

प्रमाणबद्धता : वस्तूचा आकार एकमेकांच्या तुलनेत लहान-मोठा होणार नाही याची काळजी घ्या. पेन्सिलच्या साहाय्याने अंतर मोजण्याची पद्धत शिका.

छाया-प्रकाश : वस्तूवर प्रकाश कुठून येतोय आणि सावली कुठे पडतेय, हे काळजीपूर्वक पाहून त्याप्रमाणे पेन्सिल शेडिंग किंवा वॉटर कलर, पेस्टल कलरचा वापर करा. वस्तुचा त्रिमितीय भाग दिसणे महत्त्वाचे आहे, स्मरणचित्र या विषयात दिलेल्या विषयावर आधारित (उदा. भाजी विक्रेता, पावसाळा, शाळेचे मैदान, खेळणारी मुले) स्वतःच्या कल्पकतेने चित्र काढावे लागते.

**सराव कसा करावा?**

**मानवी आकृत्यांचा सराव :** मानवी शरीराचे विविध हावभाव, हालचाली (बसणे, चालणे, वाकणे, धावणे) यांचे दररोज जलद रेखाटन करा.

**निसर्ग आणि वातावरण :** सभोवतालच्या परिसराचे (झाडे, घरे, रस्ते) निरीक्षण करा. चित्रात पार्श्वभूमी आणि अग्रभुमी स्पष्ट दिसली पाहिजे, रंगकाम : यासाठी साधारणपणे जलरंग किंवा पोस्टर रंग वापरले जातात. रंगांचे शेडिंग करून चित्रात जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न करा, संकल्पचित्र या विषयात वेगवेगळ्या भौमितिक किंवा नैसर्गिक आकारांचा (पाने, फुले, पक्षी) वापर करुन एक सुंदर डिझाईन किंवा नक्षी तयार करायची असते.

**सराव कसा करावा?**

आकारांची पुनरावृत्ती : वेगवेगळ्या आकारांची एकमेकांवर केलेली रचना आकर्षक दिसली पाहिजे, रंगसंगती : यासाठी विरोधी रंगसंगती किंवा सुसंवादी रंगसंगती वापरुन चित्र उठावदार बनवा. रंगकाम अत्यंत स्वच्छ आणि अचुक असावे, नवनिर्मिती : जुन्या प्रश्नपत्रिकांमधील डिझाईन्स पाहा आणि स्वतः नवीन आकृत्यांचे संयोजन करण्याचा सराव करा, भूमिती आणि अक्षरलेखन, कॅलिग्राफी हा विषय दोन्ही परीक्षांमध्ये गुण मिळवुन देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण यामध्ये पैकीच्या पैकी गुण मिळू शकतात.

**सराव कसा करावा?**

भुमिती : वर्तुळ, त्रिकोण, चौकोन काढणे, दिलेल्या रेषेचे समान भाग करणे, कोन दुभागणे यांसारख्या मूलभूत भौमितिक रचनांचा सराव करा. कंपास पेटीतील साधनांचा अचूक वापर करा, अक्षरलेखन : दिलेल्या शब्दांचे अक्षरांचे ब्लॉक कसे तयार करायचे, अक्षरांची जाडी आणि उंची कशी समान ठेवायची, याचा सराव करा. रोमन किंवा देवनागरी (मराठी) दोन्ही प्रकारच्या अक्षरांचा सराव ठेवा. कॅलिग्राफी : कॅलिग्राफी पेन्स किंवा ब्रशचा वापर करून अक्षरांना सुंदर वळण देण्याचा सराव करा.

**सरावासाठी काही महत्त्वाच्या टिप्स :**

वेळेचे नियोजन : परीक्षेचा वेळ मर्यादित असतो. त्यामुळे घरात सराव करताना घड्याळ लावून दिलेल्या वेळेत चित्र पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

साहित्याचा दर्जा: चांगल्या दर्जाचे पेन्सिल (२ इ, ४ इ, ६ इ), रबर, रंग आणि पेपर वापरा, जेणेकरुन तुमचे काम खराब होणार नाही. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका: गेल्या ५ ते १० वर्षांच्या शासकीय रेखाकला परी-क्षेच्या प्रश्नपत्रिका मिळवा आणि त्या सोडवण्याचा सराव करा. शासकीय रेखाकला परीक्षेच्या (एलिमेंट्री आणि इंटरमीडिएट)



**पांढऱ्या शुभ्र कागदावरची स्वप्नं: रेखाकला परीक्षेची एक साधी, सुंदर सफर!**

शाळेचे दिवस आणि त्यातही चित्रकलेचा तास म्हटलं की, आजही मनात एक वेगळीच ऊब दाटून येते. पण जेव्हा या आवडीचं रुपांतर शासकीय रेखाकला परीक्षे'त होतं, तेव्हा त्या रंगीबेरंगी छंदाला एका शिस्तीची आणि साधनेची किनार लाभते. एलिमेंट्री आणि इंटरमीडिएट या फक्त परीक्षा नाहीत, तर एका बालकलाकाराने स्वतःच्याच कल्पकतेशी मारलेली ती एक सुंदर उडी असते. या परीक्षेचा सराव म्हणजे केवळ रंगांची उधळण नव्हे, तर ती कागदावर चालणारी एक मूक तपश्चर्या आहे.

**वस्तूचित्राचा जिवंतपणा :** निर्जीव वस्तूंशी बोलताना समोर ठेवलेला एक साधा पाण्याचा तांब्या, शेजारी ठेवलेली बादली आणि त्यावर ठेवलेलं एखादं सफरचंद. एरवी आपण यांच्याकडे साध्या नजरेने पाहतो. पण आर्टच्या विद्यार्थ्याला त्यात प्रकाशाचा खेळ दिसतो. वस्तूचित्राचा सराव करताना पेन्सिल हाताच्या बोटांमध्ये अशी काही स्थिरावते की, कागदावर त्या वस्तुचा त्रिमितीय (३ ऊ) आकार जिवंत होऊ लागतो. डाव्या बाजूने येणारा प्रकाश आणि उजवीकडे झुकणारी त्याची ती गडद सावली हे हुबेहूब उतरवणं म्हणजे एका निर्जीव वस्तुला कागदावर श्वास देण्यासारखं आहे. दररोज घरातल्या छोट्या-छोट्या गोष्टींकडे निरखून पाहताना, जगण्याची नजरच बदलून जाते.

**स्मरणचित्राचे रंग :** आठवणींच्या कॅनव्हासवर स्मरणचित्र म्हणजे आपल्याच मनाच्या कोपऱ्यात दडलेल्या आठवणींचा सिनेमा! 'पावसाळ्यात छत्री घेऊन जाणारी माणसं' किंवा 'भाजी बाजारातील गडबड'. हे विषय जेव्हा समोर येतात, तेव्हा डोळे मिटून त्या दृश्याची कल्पना करावी लागते. धावणारी मुलं, वाकलेली आजी, हसणारा विक्रेता. या मानवी आकृतींच्या हालचाली कागदावर अचूक पकडणं हे एका जादूगारासारखं आहे. वॉटर कलरचा पाण्याचा हात फिरवला की, कागदावर जणु तो प्रसंग पुन्हा जिवंत होतो. हा सराव आपल्याला सभोवतालच्या माणसांचे हावभाव आणि त्यांच्या भावना समजून घेण्याची एक नवी दृष्टी देतो.

**संकल्पचित्राची जादू :** आकारांचे सुंदर गणित संकल्पचित्र म्हणजे शिस्त आणि कल्पकता यांचा एक सुंदर संगम. एक वर्तुळ किंवा चौकोन आणि त्यात पाना-फुलांचे किंवा भौमितिक आकारांचे एकमेकांवर चढणारे थर. इथे रंगांची निवड खूप बोलकी असते. कोणत्या रंगाशेजारी कोणता रंग खुलून दिसेल, हे ठरवताना मनाची आणि रंगांची एक वेगळीच गट्टी जमते. ब्रशचा टोकदार टोक जेव्हा त्या डिझाईनच्या कडा अचुक रंगवतं, तेव्हा मिळणारे समाधान काही वेगळंच असतं. हे चित्र आपल्याला आयुष्यातही वेगवेगळ्या घटकांचा समतोल कसा राखायचा, हे नकळत शिकवून जातं.

**भूमिती आणि अक्षरलेखन :** अचूकतेचा मंत्र आता वळुयात सगळ्यात शांत आणि अचूक विषयाकडे. भुमिती आणि अक्षरलेखन. इथे कल्पनेपेक्षा हाताचा स्थिरपणा आणि कंपासच्या साधनांची अचूकता जास्त महत्त्वाची असते. रेषेचे समान भाग करणे किंवा कोन दुभागणे, या तांत्रिक गोष्टी आहेत. पण त्यासोबत जेव्हा 'कॅलिग्राफी' किंवा ब्लॉक लेटर्स जोडले जातात, तेव्हा शब्दांना एक देखणं रूप प्राप्त होतं. अक्षरांचा आकार, त्यांची जाडी यातील समप्रमाणता मनाला एक प्रकारची एकाग्रता देऊन जाते. परीक्षेमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवून देणारा हा हक्काचा विषय आहे. शेवटी या दोन्ही परीक्षांची तयारी करताना लागणारा संयम, वेळेचे नियोजन आणि साहित्याची योग्य हाताळणी. या गोष्टी एका विद्यार्थ्याला फक्त चित्रकलेतच नाही, तर आयुष्याच्या परीक्षेतही परिपक्व बनवतात. तो पांढरा शुभ्र कोरा कागद जेव्हा रंगांनी आणि रेषांनी नटून पूर्ण होतो, तेव्हा मिळणारा आनंद हा कोणत्याही यशापेक्षा मोठा असतो. चला तर मग, पेन्सिलला टोक करुयात आणि रंगांची ही सुंदर सफर सुरु ठेवुयात!



विष्णु एस. सालपे
कलाशिक्षक डॉ.माधवराव पानसे विद्यालय वरुड.

# निवडणुकांचे निकाल फिक्स करणारे 'ज्ञानेशगेट'

'वोटचोरी' आणि मतदार याद्यांतील अनियमिततेच्या आरोपांची संयुक्त संसदीय समितीमार्फत स्वतंत्र, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी झाली पाहिजे आणि संबंधित सर्व नोंदी संसदेसमोर ठेवण्यात आल्या पाहिजेत. चौकशी पूर्ण होईपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर ठेवावे.

निवडणूक आयोगाच्या चार भिंतीआड दडलेली गुपिते आणि अंतर्गत मतभेद आता देशाच्या लोकशाहीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहेत. मतदार यादी, SIR, Form-६ आणि डिजिटल मतदार व्यवस्थापनासारख्या निवडणुकीच्या मूलभूत प्रक्रियांवर आयोगातीलच दोन निवडणूक आयुक्तांनी वारंवार लेखी आक्षेप नोंदवणे आणि काही निर्णय आपल्या माहितीशिवाय किंवा सहमतीशिवाय घेतल्याचे नमूद करणे, ही केवळ प्रशासकीय विसंगती म्हणून दुर्लक्षित करता येणारी बाब नाही.

राहुल गांधी यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या 'वोटचोरी' च्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हे आक्षेप समोर आल्याने या आरोपांची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. कारण प्रश्न आता केवळ मतदारांची नावे वगळली किंवा जोडली गेली का, एवढाच उरलेला नाही; प्रश्न असा आहे की, भारताच्या निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचे निर्णय नेमके कोण घेत होते, कोणाच्या संमतीने घेत होते आणि त्या निर्णयांची घटनात्मक जबाबदारी नेमकी कोणाची होती ?

निकाल फिक्स होत आहेत का? या प्रश्नांची वस्तुनिष्ठ,




पारदर्शक आणि सार्वजनिक उत्तरे मिळणे ही केवळ प्रशासकीय गरज नाही, तर भारतीय लोकशाहीवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठीची घटनात्मक आवश्यकता आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ३० वर्षांपूर्वीच दिलेला इशारा टी. एन. शेषन यांच्या काळात मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांबाबत निर्माण झालेल्या वादावर T. N. Seshan v. Union of India या ऐतिहासिक निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोग ही बहुसदस्यीय संस्था असून निवडणूक आयुक्तांना निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांचे मत अंतिम मानून इतर आयुक्तांना निष्प्रभकिंवा केवळ शोभेचे बाहुले बनवणे संविधानाशी सुसंगत नाही. या तत्त्वाचे वर्णन CEC हा 'First Among Equals' म्हणजे 'समानांमधील प्रथम', असे करण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त हे आयोगाचे अध्यक्ष असले तरी ते इतर आयुक्तांपेक्षा घटनात्मकदृष्ट्या सर्वशक्तिमान नाहीत. बहुसदस्यीय संस्थेचा अर्थच असा की निर्णयप्रक्रियेत मतभेदांना स्थान असेल आणि सामूहिक निर्णयाला महत्त्व असेल.

निर्माण झालेला घटनात्मक प्रश्न पहिल्यांदा मतदार म्हणून नोंदणी करणाऱ्या नागरिकांसाठीच्या षीा-६ या अर्जात नवीन मतदाराला त्याचे स्वतःचे, आई-वडिलांचे किंवा आजी-आजोबांचे नाव मागील डखठ च्या मतदार यादीत होते की नाही, हे सांगावे लागते. हा कॉलम औपचारिकरीत्या अनिवार्य नसला तरी त्याचे उत्तर दिल्याशिवाय ऑनलाइन अर्ज पुढे जात नाही. संधू आणि जोशी यांनी या बदलावर आक्षेप घेतला. Form-६ हा वैधानिक स्वरूपाचा अर्ज असल्याने त्यात बदल करण्यासाठी Registration of Electors Rules, १९६० मध्ये सुधारणा करणे गरजेचे असून त्याचा अधिकार सरकारला आहे आयोगाला नाही.

मतदार यादी : विकेंद्रीकरण विरुद्ध केंद्रीकरण Representation of the People Act आणि संबंधित नियमांनुसार मतदार यादी तयार करण्याची आणि त्यातील नोंदींबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी मतदार नोंदणी अधिकारी म्हणजे एठज यांच्यावर आहे. तो स्थानिक पातळीवरील वैधानिक अधिकारी असतो. संपूर्ण मतदार यादीवर एका व्यक्तीचे किंवा केंद्रीय यंत्रणेचे नियंत्रण राहू नये म्हणून ही रचना जाणीवपूर्वक विकेंद्रित ठेवलेली आहे. परंतु एउखछशीं च्या माध्यमातून मतदार यादी व्यवस्थापनातील डिजिटल प्रवेशाचे नियंत्रण दिल्लीतील केंद्रीय पातळीवर वाढत असल्याबाबत संधू आणि जोशी यांनी आक्षेप घेत कॅबिनेट सचिवांकडे याबाबत पत्रव्यवहार केला आहे.


पश्चिम बंगाल : SIR आकड्यांमागे दडलेला प्रश्न निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, २७.१६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती आणि त्यापैकी २२ लाखांहून अधिकांनी अपील केले. एकूण ३८.३१ लाख अपिले दाखल झाली; त्यापैकी १६.१० लाख अपिले निवडणूक आयोगाने केली. हा निर्णय कोणी घेतला? आम्हाला तर त्याची माहिती नाही असा आक्षेप संधू आणि जोशी यांनी नोंदवल्याने डखठ वर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# कलावंताबाई भोंडे यांचे निधन

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

**वरुड** – पंचायत समिती माजी उपसभापती तथा राजुरा बाजार येथील मिरची व्यापारी दिलीप भोंडे यांच्या मातोश्री कलावंताबाई गोपाळराव भोंडे यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. त्यांचे पार्थिव वरुड शहरातील शाकुंतल कॉलनी परिसरातून न.प.मोक्षधाम येथे नेण्यात येवुन तेथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मनोहर, ज्ञानेश्वर,



माधव व दिलीप अशी ४ मुले, सुना, नातवंड असा बराच मोठा परिवार आहे.

त्यांच्या निधनाने राजुरा बाजार व वरुड शहरात शोक व्यक्त केल्या जात आहे.

## सावंगा येथे माविमच्या पुढाकारातून

# निर्माल्याचे पर्यावरणपुरक व्यवस्थापन

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

**वरुड** – महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), अमरावती अंतर्गत प्रेरणा लोकसंचालित साधन केंद्र जरुड यांच्या पुढाकारातून सांवगा येथे अन्नपूर्णा शेतकरी महिला बचत गटाच्या महिलांनी गणेशोत्सवानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम राबवित निर्माल्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन केले. वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ.रंजन वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.



गणेश विसर्जनासाठी तालुक्यातील सुमारे २० ते २५ गावांतील भाविक सांवगा येथील तलावावर आले होते. विसर्जनानंतर तलावात जमा झालेले हार, फुले, दुर्वा तसेच अन्य पूजेचे साहित्य महिलांनी ट्रॅक्टर–ट्रॉलीत संकलित करुन नियोजित खड्ड्यात टाकले. त्यानंतर निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याच्या दृष्टीने त्याची पर्यावरणपूरक विल्हेवाट लावण्यात आली. पूजेच्या साहित्यातील प्लास्टिक व पॉलिथिन वेगळे करुन त्याचीही योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली.

या उपक्रमाला सरपंच माया सोनागती, भोजराज आंडे, सीएमआरसी सचिव भारती चरोडे, सीएमआरसी व्यवस्थापक अर्चना खांडेकर, उपजीविका सल्लागार मयुरी ठाकरे, माविम मित्र मंडळाचे सदस्य तेजस परतेती व त्यांची टीम, सीआरपी मनीषा भडांगे, अन्नपूर्णा महिला बचत गटाच्या महिला तसेच मोठ्या संख्येने उपस्थित गणेशभक्तांचे सहकार्य लाभले.

# प्लास्टिकबंदीची मोहीम आणखी तीव्र होणार

**फेरीवाले, दुकानदारांसह गोदामधारकांवरही कारवाई**

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

**मुंबई** – प्रतिबंधित ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांची विक्री, साठवणूक आणि वापर रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आता आणखी कठोर भूमिका घेणार आहे. फेरीवाले, दुकानदार



आणि व्यापाऱ्यांबरोबरच मोठ्या गोदामधारकांवरही विशेष मोहीम राबवून कारवाई करण्याचे निर्देश महापालिकेच्या विधी समिती अध्यक्षा दिक्षा कारकर यांनी दुकाने व आस्थापना विभागाला दिले आहेत. मुंबईत प्लास्टिकबंदी लागू असली तरी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर अद्याप होत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः सणासुदीच्या काळात प्लास्टिक पिशव्या आणि वेष्टनांचा वापर वाढत असल्याने पर्यावरणासह पावसाळ्यातील जलनिस्सारण व्यवस्थेवरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

# ई-पिक पाहणी सहाय्यकांची मानधनवाढीची मागणी

**तहसीलदारांना निवेदन**

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**वरुड** – तालुक्यात ई–पिक पाहणीचे काम करणाऱ्या सहाय्यकांनी आपल्या मानधनात वाढ करण्यासह २०२१ पासून प्रलंबित असलेली थकबाकी तातडीने अदा करण्याची मागणी करत तहसीलदार, वरुड यांना निवेदन सादर केले आहे. ई–पिक पाहणीचे काम अत्यंत कष्टाचे आणि जोखमीचे असल्याने प्रति गट १०० रुपये मानधन मंजूर करावे, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, ई–



पिक पाहणीसाठी शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी करणे, मोबाईलद्वारे माहिती नोंदविणे, छायाचित्रे अपलोड करणे आणि ऑनलाइन माहिती अद्ययावत करणे अशी विविध कामे करावी लागतात. मात्र, या कामासाठी मिळणारे मानधन कामाचे स्वरुप, लागणारा वेळ, प्रवास खर्च, मोबाईल व इंटरनेटवरील खर्च तसेच वाढलेल्या महागाईच्या तुलनेत अत्यल्प असल्याची खंत सहाय्यकांनी व्यक्त केली आहे.

सहाय्यकांनी आपल्या निवेदनात कामादरम्यान अनेक जोखमींचाही उल्लेख केला आहे. शेतात काम करताना साप, विंचू, भटके कुत्रे आणि इतर जंगली प्राण्यांचा सामना करावा लागत असल्याने हे काम धोकादायक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. याशिवाय, सन २०२१ पासून अनेक सहाय्यकांचे मानधन अद्यापही प्रलंबित असून ते तातडीने त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे, अशीही मागणी ई–पिक पाहणी सहाय्यक बिमराव बसले, विजय दुपारे, योगेश युवनाते, नंदकुमार राऊत, गौतम गजभिये, शैलेश चौधरी, जगदीश काशीकर, रामेश्वर उईके, मनोज टोंगसे, राजू नवलेख, सुरेश डोंगरे, भूपेश सरयाम, अमीस बेगम, दिलीप ढोमणे, शुभम दवांडे, मनोज मरसकोल्हे आणि संदीप बागडे आदींनी केली आहे.

# धनोडी रस्त्यावरील प्रवासी निवाऱ्यात आढळला ईसमाचा मृतदेह

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**वरुड** – येथील मलकापूर परिसरातील धनोडी रस्त्यावरील प्रवासी निवाऱ्यात एका अनोळखी इसमाचे बेवारस प्रेत आढळुन आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी याबाबत शहानिशा केली. तेव्हा मृतकाची ओळख पटविण्यात शें.घाट पोलिसांना यश आले. सुकन मंगल काचदे



(५०) रा.निमझरी ता.आमला जि.बैतुल असे मृतकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, मलकापूर परिसरातील शेतकरी ओकांर जोगेकर यांचे जामतळा शेत शिवारात शेत आहे. त्या शेतात सुकन काचदे सोकारी म्हणून कार्यरत होता. त्याला दारुचे व्यसन होते. मागिल ५ दिवसांपासून मृतक खोपडीवरुन बेपत्ता असल्याची माहिती त्याच्या मुलाने दिली. शुक्रवारी सकाळच्या सुमारास एक अनोळखी इसम मलकापूर येथील धनोडी रोडवरील प्रवासी निवाऱ्यात मृतावस्थेत स्थानिक नागरिकांच्या निर्दशनास आले. त्यामुळे त्यांनी याबाबत शे.घाट पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व त्या इसमाची ओळख पटविण्यासाठी शर्यतीचे प्रयत्न केले. अखेर मलकापूर परिसरातच पंकज वघाळे यांच्या घरी भाड्याने राहणारा मृतकाचा मुलगा संदिप कासदे (२२) याने पुढे येत मृतक त्याचे वडिल असल्याची माहिती पोलिसांना दिली. मृतकाचे शव शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असुन पुढील तपास ठाणेदार राहुल गवई यांच्या मार्गदर्शनात विरेंद्र अमृतकर, विजय गुल्हाने, मदन उईके करित आहे.



**वरुड :** कृषी उत्पन्न बाजार समिती वरुडचे संचालक व भाजप नेते अमित कुबडे यांना पुष्पगुच्छ देवुन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य मोरेश्वर वानखडे, माजी जि.प.सदस्य गोपाल मालपे, निळकंठ उर्फ बाळु मुरुमकर, बाबाराव काळे व इतर.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१२/२०२६** **ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रकाश शेषरावजी भोयर, वय अं.६१ वर्ष, धंदा–शेती

२) विलास शेषराव भोयर, वय अं.५५ वर्ष, धंदा–शेती

अर्जदार क्र.१ व २ रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मृतक नामे उषा शेषराव भोयर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८६/२०२६** **ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) वच्छला किसन दुधकवरे, वय अं.७५ वर्ष, धंदा–घरकाम

२) सतिश किसनराव दुधकवरे, वय अं.४३ वर्ष, धंदा–मजूरी

क्र.१ व २ रा.झोलंबा, पो.सावंगा, ता.वरुड, जि.अमरावती

३) जयमाला अशोक कोसरे, वय अं.४५ वर्ष, धंदा–घरकाम

रा.बारगाव, ता.वरुड, जि.अमरावती

४) प्रतिभा सुनिलराव ठाकरे, वय अं.३८ वर्ष, धंदा–घरकाम

रा.भारसिंगी, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किसन जंगलू दुधकवरे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१३/२०२६** **ने.ता.२३/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रिया राजू गाडगे, वय अं.३८ वर्ष, धंदा–घरकाम

२) कु.देवश्री राजू गाडगे, वय अं.१० वर्ष, धंदा–शिक्षण

३) कु.साईश्री राजू गाडगे, वय अं.०३ वर्ष, धंदा–काही नाही

४) सुमित्रा वामनराव गाडगे, वय अं.७३ वर्ष, धंदा–घरकाम

(अर्जदार क्र.१ ही.अर्जदार क्र.२, ३ करीता अ.पा.क. म्हणुन आई आहे.) सर्व रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मृतक नामे राजू वामनराव गाडगे, रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८५/२०२६** **ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) रजनी रामदास वानखडे, वय अं.६२ वर्ष, धंदा–गृहिणी

२) आशिष रामदास वानखडे, वय अं.४२ वर्ष, धंदा–मजुरी

३) अतुल रामदासजी वानखडे, वय अं.३५ वर्ष, धंदा–मजुरी

अर्जदार क्र.१ ते ३ रा.लोणी, ता.वरुड

४) स्वाती मनोज सावरकर, वय अं.३८ वर्ष, धंदा–गृहीणी

रा.खैरगाव, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामदास नामदेवराव वानखडे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# एसटीतील दोषी अधिकाऱ्यांना बढती : सक्षम प्राधिकाऱ्यांचे निर्णय वादाच्या भोवऱ्यात



**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**मुंबई** – राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार, नेमून दिलेल्या कामातील हलगर्जीपणा, कुचराई आदी आरोप लाऊन आरोपपत्रे दिलेल्या ४० पेक्षा जास्त दोषी अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकार्यांनी शिक्षा दिल्या आहेत. यातील काही अधिकाऱ्यांना राज्यभरात, त्यातील काहीना मध्यवर्ती कार्यालयात महत्त्वाच्या पदांवर बढती देण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केला आहे. एसटी महामंडळाच्या विशेषतः मध्यवर्ती कार्यालयात महत्त्वाच्या विभागांमध्ये दोषी ठरवण्यात आलेल्या संधी मिळाल्याने सक्षम प्राधिकाऱ्यांचे निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. त्यामुळे एसटीच्या प्रशासनातील शिस्त व आवेदन पद्धतीतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे असे संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी स्पष्ट केले आहे. एसटी महामंडळातील ४० अधिकाऱ्यांना गंभीर प्रकरणांमध्ये लाऊन चौकशी किंवा शिस्तभंगाच्या कारवाईच्या कक्षेत आणले मात्र बढती देताना त्यांना किरकोळ शिक्षा दिल्या आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८११/२०२६** **ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

चित्रा शंकरराव शेवतकर

वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम

रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत माणिक कृष्णराव ढोबळे व मयत वंदना माणिकराव ढोबळे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८००/२०२६** **ने.ता.३१/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्री दिनेश बबनराव गुल्हाने, वय अं.६८ वर्ष, धंदा-मजुरी

२) श्री.प्रकाश बबनराव गुल्हाने, वय अं.६२ वर्ष, धंदा-मजुरी

३) सौ.निलीमा सुनिलराव शिरभाते, वय अं.५७ वर्ष, धंदा-घरकाम

४) सौ.वसुंधरा अरुनराव डेहनकर, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम

५) श्री.प्रविण किशोरराव ऊर्फ बबनराव गुल्हाने, वय अं.६० वर्ष, धंदा-मजुरी, अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.४ व ५ रा.चांदापुर, ता.घाटाजी, जि.यवतमाळ

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे बबनराव यादवराव गुल्हाणे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१५/२०२६** **ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती प्रतिभा सुरेश खुटाटे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम

२) कपील सुरेश खुटाटे, वय अं.४२ वर्ष, धंदा-व्यापार

३) हितेश सुरेश खुटाटे, वय अं.३८ वर्ष, धंदा-व्यापार

४) सौ.पुनम राकेश खंडेलवाल, वय अं.४५ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

क्र.४ रा.सराफा बाजार इटारसी, ता.इटारसी

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे सुरेश कामलनारायण खुटाटे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६०/२०२६** **ने.ता.०२/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती कमला मधुकर खेरडे, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम

२) कवीश्वर राजेंद्र खेरडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- मजुरी

३) सौ.कवीता संजय सुपले, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) गौरव राजेंद्र खेरडे, वय अं.३५ वर्ष, धंदा-मजुरी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती


ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे राजेंद्र मधुकरराव खेरडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०२/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# आंदोलनातील सहकाऱ्यांवर धडाधड कारवाई, अंतरवालीतील मंडप काढला, मनोज जरांगे सरकारवर संतापले



**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**छत्रपती संभाजीनगर** – सरकारने मला कितीही त्रास द्यायचा प्रयत्न केला तरी मी मागे हटणार नाही. मी मरेन पण तुमच्याशी मैत्री करणार नाही. मी तुमचा गुलाम होणार नाही. त्यापेक्षा लढता लढता मरणे पसंत करेन, असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले. राज्य सरकारकडून माझ्यासोबत आंदोलनात असणाऱ्यांना त्रास दिला जात आहे. त्यांचं म्हणणं आमचं ऐकावं. त्यामुळे आमच्या लोकांना त्रास दिला जात आहे. पण आमची तुरुंगात जायची तयारी आहे, असे मनोज जरांगे यांनी ठणकावून सांगितले. ते सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मनोज जरांगे यांच्या कोअर कमिटीतील सदस्य संजय कटारे यांच्यावरील अवैध वाळू उत्खनन प्रकरणातील कोट्यवधीचा वाळूचा दंड कायम ठेवण्यात आला आहे. यासंदर्भात पूर्वीचा तहसीलदारांनी दिलेला आदेश रद्द करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांची आयकर विभागाकडून चौकशी होणार असल्याची माहितीही समोर आली होती. याबाबत बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर चांगलीच आगपाखड केली. माझ्यासोबत आंदोलनात असलेल्यांना त्रास होणारच आहे. सरकारने आरक्षण द्यायला तीन महिने वेळ घेतला, आता मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत. पण सरकारने आता आम्हाला घायाळ करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६२/२०२६** **ने.ता.२८/१०/२०२६**

**अर्जदार :-**

श्री.रविंद्र विनायक चौकरी

वय अं.७९ वर्ष, धंदा-मजुरी

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे भाष्कर विनायक चौधरी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५९/२०२६** **ने.ता.२८/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) ऊमेश ज्ञानेश्वर नेहारे, वय अं.३५ वर्ष, धंदा-मजुरी

२) ऊमेश ज्ञानेश्वर नेहारे, वय अं.३३ वर्ष, धंदा- मजुरी

३) श्रीमती आशा ज्ञानेश्वर नेहारे, वय अं.५५ वर्ष, धंदा- मजुरी

अर्जदार क्र.१ ते ३ रा.बारगाव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे ज्ञानेश्वर धोंडबाजी नेहारे, रा.बारगाव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६५/२०२६** **ने.ता.२८/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती शालीनी बाबाराव विंचुरकर, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, २) सौ.प्रिती प्रदिपराव काळे, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम, ३) प्रिया प्रशांत ऊजैनकर, वय अं.३२ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, क्र.३ रा.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे बाबाराव कृष्णराव विंचुरकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५३/२०२६** **ने.ता.२९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती ललिता अरुणराव धोटे, वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी, २) रोशन अरुणराव धोटे, वय अं.३३ वर्ष, धंदा- शेती, दोन्ही रा.उदापुर, ता.वरुड, ३) शितल सचिन कुटे, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.लोहारी सावंगा, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अरुण विनायक धोटे, रा.उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# महाराष्ट्राचे नवे केमिकल, पेट्रोकेमिकल धोरण ऑक्टोबरमध्ये : 'असोचेम' च्या शिफारशींवर शिक्कामोर्तब होणार



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** –पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित २०४७ भारताच्या स्वप्नपूर्तीकरिता महाराष्ट्राची साथ मिळावी या हेतूने देशव्यापी संघटना असोचेमने पुढाकार घेतला असून उद्योग संस्थेने केलेल्या शिफारशी अमलात आणण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून राज्याची अर्थव्यवस्था वन ट्रिलियन डॉलर बनविण्याच्या हेतूने संघटनेने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्त्वावर आधारित नवे केमिकल्स, पेट्रोकेमिकल्स धोरण पुढच्या महिन्यात – ऑक्टोबरमध्ये जाहीर होणार आहे. राज्य सरकार आणू पाहत असलेल्या नव्या केमिकल्स, पेट्रोकेमिकल्स धोरणामुळे महाराष्ट्रातील उद्योग असमतोल नाहीसा होणार असून विदर्भ, मराठवाड्याबरोबरच चैथ्या आणि तिसर्या मुंबईवर अधिक लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. या अंतर्गत समर्पित केमिकल्स पार्क, पेट्रोकेमिकल्स फिडस्टॅक, केमिकल्स इन्होव्हेशन पार्क हे विशेषत: राज्याच्या सागरी मार्गानजीकच्या कोंकण परिसरात विकसित केले जाणार आहेत. या क्षेत्रातील कंपन्यांना भेडसावणाऱ्या टाकाऊ रसायन, प्रदुषित व धोकादायक साहित्य यावर उपाय म्हणून शून्य रसायन स्रोत, पुनर्प्रक्रिया वा विघटन तसेच सुरक्षा व पर्यावरण यासाठी उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

## एल निनो संकट तीव्र होणार

# पुढील वर्षाचीही तयारी करावी लागेल, फडणवीसांचा इशारा



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आल्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एल निनो'चे संकट अधिक तीव्र होत जाणार असल्याच्या शक्यतेला दुजोरा दिला आहे. एल निनोमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करण्यात येणार असून फेब्रुवारी अखेरपर्यंत हे संकट उच्चांक पातळी गाठण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्राधान्याने पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येत असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. सरकारने ज्या दुष्काळग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर केली आहे, त्यामध्ये नाव नसलेल्या तालुक्यांच्या अडचणी सुद्धा आम्ही दूर करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पत्रकार परिषद घेत दुष्काळ आणि एल निनो या विषयांवर भाष्य केले. ङ्गएल निनो अजून तीव्र होत जाणार आहे. फेब्रुवारीनंतर त्याची तीव्रता कमी होईल. अशा पद्धतीचे पॅसिफिक ओशन हीटिंग असते त्यात फेब्रुवारीनंतर शिथिलता यायला सुरू होईल. त्यामुळे आपल्याला सगळ्या प्रकारच्या तयारीत राहावे लागेल. एल निनोचा परिणाम वाढला तर आपल्याला ज्या अडचणी येतील, त्यासाठी तयारीत राहावे लागेल, असे फडणवीसांनी स्पष्ट केले.

# वरुड तालुक्यात दुष्काळ जाहीर : प्रशासन ॲक्शन मोडवर

## आजपासुन पंचनामे करण्याचे निर्देश : एसडीओ, तहसिलदारांनी दिले निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शासनाने वरुड तालुक्यात दुष्काळसदृश्य स्थिती जाहीर केली आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने उद्यापासूनच शेतीच्या नुकसानीचे पंचनामे सुरु करावेत, असे निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत.

शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये ट्रिगर १ शासनाने मंजूर केला आहे. ट्रिगर २ ची कुठलीही वाट न पाहता ट्रिगर ३ म्हणजेच क्षेत्रिय सत्यापन यासाठी पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. सर्व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांनी तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि आवश्यक असलेल्या सर्व यंत्रणांचा समन्वय साधून जिल्ह्यातील पंचनाम्याची कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले.

त्यासोबतच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तालुकास्तरावर शेतकरी मदत कक्ष कार्यान्वित करावा. शेतकऱ्यांचे पंचनामे तसेच कर्जमुक्ती योजनेत त्यांना मिळवायचा लाभ व त्यासाठी करायची ई–केवायसी, तसेच शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी लागणार आहे. यासाठी बँका व सहकार सहनिबंधक यांच्याशी आवश्यक समन्वय साधावा. तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांद्वारे नवीन कर्ज दिले जाईल, याची खात्री करावी, असे निर्देश दिले असून शासन निर्णयानुसार नुसार वरुड तालुका हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला असून सर्व पिकांचे पंचनामा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे, तहसीलदार रामदास शेळके यांनी मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांना संयुक्तिक पंचनामे करण्याचे निर्देश दिलेले आहे.

# शासकीय रुग्णालयातील कोरोना काळातील ऑक्सिजन प्लांट बंद : सिलिंडर खरेदी सुरु!

## ✻ लाखो रुपये खर्चून उभारलेल्या यंत्रणेचा उपयोग नाही ✻ बाहेरुन ऑक्सिजन खरेदीवर पुन्हा लाखोंचा खर्च ✻ चौकशीची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्वसनाचा त्रास असलेल्या रुग्णांना सतत ऑक्सिजन देता येतो. आयसीयु, ऑक्सिजन बेड, आपत्कालीन विभाग आणि ऑपरेशन थिएटरसाठी ऑक्सिजन उपलब्ध राहतो. बाहेरून ऑक्सिजन सिलिंडर किंवा लिक्विड मेडिकल ऑक्सिजन मागवण्यावरील अवलंबित्व कमी होते. ऑक्सिजनची अचानक मागणी वाढल्यास आपत्कालीन बॅकअप म्हणुन उपयोग होतो. दुर्गम भागातील रुग्णालयांना स्वतःच्या गरजेपुरता ऑक्सिजन तयार करण्यास मदत होते. केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पीएसए प्लांटला रुग्णालयाच्या ऑक्सिजन पुरवठ्याचा प्राथमिक स्रोत किंवा बॅकअप म्हणुन वापरण्याची तरतूद आहे. प्लांट बसवला म्हणजे तो आपोआप उपयोगी ठरत नाही. त्यासाठी नियमित देखभाल, प्रशिक्षित कर्मचारी, वीज व पॉवर–बॅकअप आणि योग्य पाइपलाईन व्यवस्था आवश्यक आहे.

कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनची कमतरता भासू नये, तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर वैद्यकीय ऑक्सिजन उपलब्ध व्हावा, यासाठी शासनाने विविध शासकीय रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन प्लांट उभारले. मात्र, कोरोनाचा काळ संपल्यानंतर अनेक ठिकाणी हे प्लांट बंद अथवा वापराविना पडून असल्याची बाब समोर येत आहे. त्यामुळे शासनाने केलेल्या मोठ्या खर्चाचा अपेक्षित उपयोग होत नसल्याने या यंत्रणांच्या देखभालीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

कोरोना काळात ऑक्सिजनची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. भविष्यात अशाच प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास रुग्णालयांना ऑक्सिजनचा तुटवडा भासु नये, हा या प्लांटमागील मुख्य उद्देश होता. मात्र, प्लांट नियमितपणे कार्यान्वित ठेवणे, त्यांची देखभाल करणे, तांत्रिक तपासणी करणे आणि संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

काही रुग्णालयांमध्ये प्लांट असूनही तांत्रिक बिघाड, देखभालीचा अभाव, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता किंवा इतर कारणांमुळे ते कार्यान्वित नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे संबंधित आरोग्य विभागाने प्रत्येक ऑक्सिजन प्लांटची सद्यस्थिती तपासून त्याचा अहवाल जाहीर करण्याची गरज आहे. ऑक्सिजन प्लांट कार्यरत आहेत का? त्यांची ऑक्सिजन निर्मिती क्षमता किती आहे? मागील काही महिन्यांत त्यांचा किती वापर झाला? देखभालीसाठी किती निधी खर्च करण्यात आला? याची माहिती सार्वजनिक झाल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

कोरोनासारखी परिस्थिती पुन्हा निर्माण झाल्यास बंद असलेल्या प्लांटचा उपयोग होणार कसा? असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे शासनाने केवळ प्लांट उभारण्यापुरते मर्यादित न राहता त्यांची नियमित देखभाल, चाचणी व कार्यान्वित स्थिती सुनिश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने शासकीय रुग्णालयांमध्ये लाखो रुपये खर्च करून ऑक्सिजन प्लांट उभारले. मात्र, सध्या अनेक ठिकाणी हे प्लांट बंद अथवा कार्यान्वित नसल्याने रुग्णालयांना पुन्हा बाहेरून ऑक्सिजन सिलिंडर खरेदी करावे लागत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ऑक्सिजन प्लांट उभारण्यासाठी करण्यात आलेला मोठा खर्च नेमका कोणत्या उपयोगाचा, असा सवाल उपस्थित होत आहे.

कोरोना काळात ऑक्सिजनची वाढती गरज लक्षात घेऊन रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन निर्मितीची कायमस्वरुपी व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. रुग्णांना वेळेवर ऑक्सिजन उपलब्ध व्हावा आणि बाहेरील पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागू नये, हा त्यामागील उद्देश होता. मात्र, प्लांटची नियमित देखभाल, तांत्रिक दुरुस्ती आणि कार्यान्वित स्थिती राखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्यास शासनाचा उद्देशच बाजूला पडत असल्याचे दिसून येते.

एका बाजूला रुग्णालय परिसरात ऑक्सिजन निर्मितीचा प्लांट उभारण्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला तर दुसऱ्या बाजूला त्याच रुग्णालयात रुग्णांच्या गरजेसाठी बाहेरूरुन ऑक्सिजन सिलिंडर खरेदी करण्यावर पुन्हा मोठा खर्च होत असल्यास ही बाब गंभीर आहे. त्यामुळे प्लांट बंद असण्याचे नेमके कारण काय? त्याच्या दुरुस्तीसाठी किती खर्च अपेक्षित आहे आणि आतापर्यंत बाहेरून ऑक्सिजन सिलिंडर खरेदीवर किती निधी खर्च झाला? याची चौकशी होणे गरजेचे आहे.

संबंधित आरोग्य विभागाने सर्व शासकीय रुग्णालयांतील ऑक्सिजन प्लांटची सद्यस्थिती तपासावी, बंद प्लांट तातडीने सुरू करावेत आणि त्यांची नियमित देखभाल करण्यासाठी ठोस व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारलेली यंत्रणा केवळ शोभेपुरती न राहता प्रत्यक्ष रुग्णसेवेत वापरली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. कोरोना महामारीच्या काळात संभाव्य ऑक्सिजन तुटवडा टाळण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये लाखो रुपये खर्च करून ऑक्सिजन निर्मितीचे प्लांट उभारण्यात आले. मात्र, काही ठिकाणी हे प्लांट सध्या कार्यान्वित नसताना रुग्णालयांकडून बाहेरून ऑक्सिजन सिलिंडर खरेदी केला जात असल्याचे चित्र असल्यास, या खरेदी प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

ऑक्सिजन प्लांट उभारण्यामागील उद्देश रुग्णालयातच वैद्यकीय ऑक्सिजन उपलब्ध करून देणे आणि बाहेरील पुरवठ्यावरील अवलंबित्व कमी करणे हा होता. मात्र प्लांट बंद आणि सिलिंडर खरेदी सुरु, अशी परिस्थिती असेल तर शासनाने उभारलेल्या यंत्रणेचा अपेक्षित उपयोग होत नसल्याचे स्पष्ट होते. यामुळे सिलिंडर खरेदीची आवश्यकता नेमकी किती होती? कोणत्या दराने खरेदी करण्यात आली? कोणत्या पुरवठादाराकडून खरेदी झाली? किती सिलिंडर खरेदी करण्यात आले आणि त्यासाठी आतापर्यंत किती निधी खर्च झाला? याची सखोल तपासणी करण्याची गरज आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्राच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडून ऑक्सिजन पीएसए प्लांट व एलएमओ टँकच्या देखभाल–दुरुस्ती आणि एएमसी/एलएमओ संदर्भात निविदा प्रक्रिया करण्यात आल्याची अधिकृत नोंद आहे. त्यामुळे प्लांट कार्यरत ठेवण्यासाठी देखभालीची व्यवस्था उपलब्ध असताना प्रत्यक्षात कोणते प्लांट बंद आहेत आणि त्यामागील कारणे काय आहेत? याची माहिती सार्वजनिक होणे आवश्यक आहे.

सिलिंडर खरेदीत प्रत्यक्ष भ्रष्टाचार झाला आहे, असे निष्कर्ष काढण्यापूर्वी कागदपत्रांची तपासणी आवश्यक आहे. मात्र, प्लांट उपलब्ध असूनही सातत्याने बाहेरून ऑक्सिजन खरेदी होत असल्यास, त्यामध्ये अनियमितता झाली आहे का? दर व निविदा प्रक्रिया नियमांनुसार झाली का? आणि शासनाच्या निधीचा योग्य वापर झाला का? याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे.

**चौकशीची मागणी**

सर्व संबंधित शासकीय रुग्णालयांतील ऑक्सिजन प्लांटची सद्य:स्थिती, मागील काही वर्षांतील सिलिंडर खरेदी, निविदा कागदपत्रे, पुरवठादार, दर, बिलांची रक्कम आणि प्लांटच्या देखभालीवरील खर्च यांचे विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. एकीकडे लाखो रुपये खर्चून ऑक्सिजन प्लांट उभारायचे आणि दुसरीकडे त्याच रुग्णालयासाठी पुन्हा लाखो रुपये खर्चून बाहेरुन ऑक्सिजन खरेदी करायचा, तर या दुहेरी खर्चाचे कारण काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ऑक्सिजन प्लांट उभारण्यासाठी शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च झालेला असताना, त्याच रुग्णालयांना पुन्हा बाहेरून ऑक्सिजन सिलिंडर खरेदी करावे लागत असतील, तर या संपूर्ण व्यवहाराची पारदर्शकता तपासणे गरजेचे आहे. प्लांट बंद का आहेत? सिलिंडरची खरेदी किती झाली? कोणत्या दराने झाली? आणि या खरेदीत कोणाला आर्थिक लाभ झाला? याची चौकशी होणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करुन या प्रकरणाचे विशेष लेखापरीक्षण व स्वतंत्र चौकशी करावी. शासनाच्या पैशाचा अपव्यय अथवा कोणतीही अनियमितता आढळल्यास जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नावर काय भूमिका घेते? आणि लाखो रुपयांच्या या खर्चाचा हिशेब कधी जनतेसमोर ठेवते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

